BSE Limited
First Floor, New Trading Ring
Rotunda Building, P J Towers
Dalal Street, Fort
Mumbai 400 001
**Kind Attn : Mr Khushro Bulsara**
**General Manager & Head**
**Listing Compliance & Legal Regulatory**

National Stock Exchange of India Ltd.
Exchange Plaza, 5th Floor
Plot No.C/1, G Block
Bandra-Kurla Complex
Bandra (East), Mumbai 400 051
**Kind Attn: Mr Lokesh Bhandari**
**Senior Manager**
**Listing & Compliance**

June 28, 2021
Sc no.16415

**Ref: ISIN: INE155A01022 – Ordinary Shares**
**IN9155A01020 – 'A' Ordinary Shares**
**Debt Securities on BSE & NSE**

Dear Sirs,

**Sub: Newspaper Advertisement – Disclosure under Regulation 30 of Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ('SEBI Listing Regulations')**

---

With further reference to our letter Sc no. 16414 dated June 26, 2021 and pursuant to Regulations 30 and 47 read alongwith Schedule III of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("the Regulation"), please find enclosed herewith a copy of advertisement published in Newspaper viz. Loksatta (Marathi) informing to the Members' that the 76th Annual General Meeting of the Members of the Company will be held on Friday, 30th July, 2021 at 3.00 p.m. (IST) through Video Conferencing / Other Audio Visual Means.

This is for the information of the members and the exchanges.

Yours faithfully,
For **Tata Motors Limited**

Hoshang K Sethna
Company Secretary

TATA MOTORS LIMITED
Bombay House 24 Homi Mody Street Mumbai 400 001
Tel 91 22 6665 8282 Fax 91 22 6665 7799
www.tatamotors.com CIN L28920MH1945PLC004520

# उपनगरीय रेल्वे प्रवासासाठी आता सरकारची परवानगी आवश्यक

## अधिकारपत्राशिवाय पास अथवा तिकीट देण्यास मनाई


**संजय बापट,लोकसत्ता**

**मुंबई :** मुंबई महानगर आणि पुणे महानगर प्रदेशातील करोना नियंत्रणासाठी राज्य सरकारने या दोन्ही ठिकाणी सर्वसामान्य नागरिकांसाठी उपनगरीय रेल्वेतून प्रवास करण्यावर निर्बंध घातले असले तरी अत्यावश्यक सेवेची बनावट ओळखपत्रे सादर करून प्रवास करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

त्यामुळे बनावट ओळखत्राच्या आधारे रेल्वेत होणारी घुसखोरी रोखण्यासाठी एकात्मिक प्रवास पास (युनिव्हर्सल ट्रॅव्हल पास) देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. हे अधिकार पत्र असेल तरच रेल्वेच्या खिडकीवर पास किं वा तिकीट यापुढील काळात मिळू शके ल. करोनाच्या दुसऱ्या लाटेत गेल्या एप्रिलपासून राज्य सरकारने फक्त अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांनाच उपनगरीय रेल्वे प्रवासाला परवानगी दिली आहे. गर्दी कमी व्हावी या उद्देशाने अत्यावश्यक सेवेतील सर्वांना या सेवेचा लाभ देण्यात आलेला नाही. तरीही बनावट ओळखपत्रांच्या आधारे पास किं वा तिकिटे मिळवली जात आहेत. यातूनच उपनगरीय रेल्वे सेवेत प्रवाशांची गर्दी वाढली. सकाळी किं वा सायंकाळी नेहमीप्रमाणे रेल्वे गाड्यांमध्ये गर्दी होऊ लागली. सध्या मध्य रेल्वेतून दररोज १८ लाख तर पश्चिम रेल्वेतून ११ ते १२ लाख प्रवासी दररोज प्रवास करीत आहेत. यातील ५० टक्के प्रवासी बनावट ओखळपत्राच्या आधारे किंवा रेल्वेची दिशाभूल करून प्रवास करीत असल्याचा संशय राज्य सरकारला आहे. त्यामुळे महानगर प्रदेशात करोनाच्या तिसऱ्या लाटेत मोठा उद्रेक होण्याच्या भीतीने रेल्वेतून होणाऱ्या प्रवासावर अधिक निर्बंध आणण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यानुसार यापुढे राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून दिले जाणाऱ्या ओळखपत्राच्या आधारेच पास देण्याची राज्य सरकारची योजना आहे.

### ओळखपत्र कसे मिळेल ?

एकात्मिक प्रवासी पाससाठी आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने तयार केलेल्या ऑनलाइन सिस्टीमवर (युनिव्हर्सल ट्रॅव्हल पास) अत्यावश्यक सेवेतील परवानगी असलेल्या सर्व आस्थापनांना आपल्या कर्मचाऱ्यांची माहिती सादर करावी लागणार आहे. त्याच्या सत्यतेची पडताळणी करूनच प्रत्येक कर्मचाऱ्याला मोबाइलवर क्युआरकोड ओळखपत्र पाठविण्यात येणार आहे. मुंबईत खाजगी रुग्णालय आणि सबंधित वैद्यकीय सेवेतील ९६ हजार कर्मचारी असून महानगर प्रदेशातील अन्य शहरांत मिळून ४५ ते ५० हजार कर्मचारी आहेत, त्यांना हे ओळखपत्र देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून पंधरा दिवसांत सर्वांना हे ओळखपत्र दिले जाईल . त्यानंतर या निर्णयाची सक्तीने अंमलबजावणी केली जाणार आहे. अत्यावश्यक सेवेतील अन्य घटकांना ते कोणत्या स्तराच्या शहरात राहतात याच्या आधारे हे पास टप्प्याटप्प्याने दिले जाणार असल्याची माहिती मंत्रालयातील उच्चपदस्थ सूत्रांनी दिली.




> युनिव्हर्सल ट्रॅव्हल पासच्या अंमलबजावणीबाबत राज्य सरकारचे पत्र मिळाले आहे. क्यूआर कोडओळखपत्राचा पाठपुरावा रेल्वे पहिल्यापासूनच करत आहे. जेणेकरून ज्यांना लोकल ट्रेन मध्ये प्रवास करण्याची परवानगी दिली आहे, तेच लोक प्रवास करूशकतात. बनावट ओखळपत्र, अवैध प्रवाशी या विरोधात रेल्वेने वेगवेगळ्या तपासण्या, मोहिम हाती घेतल्या असून, राज्य सरकारच्या निर्देशानुसार ज्यांना प्रवास करण्याची मुभा आहे, त्यानांच परवानगी दिली जाईल.
>
> – शिवाजी सुतार, मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी

## अत्यावश्यक कर्मचाऱ्यांसाठी ‘रुणवाल स्टे’

**मुंबई :** ‘रुणवाल फाउंडेशन’ आणि ‘महावीर एज्युके शन अ‍ॅण्ड रिसर्च ट्रस्ट’ यांनी संयुक्तरीत्या उभारलेल्या ‘रुणवाल स्टे’चे उद्घाटन शनिवारी नेस्को करोना केंद्राच्या अधिष्ठाता नीलम आंद्रेद यांच्या उपस्थितीत पार पडले. करोना संसर्गाच्या काळात अत्यावश्यक सेवेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी ही इमारत पालिकेकडे हस्तांतरित करण्यात आली.

पोलीस, डॉक्टर, इत्यादी अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी करोना संसर्गाचा धोका पत्करून दूरचा प्रवास करत कर्तव्यावर पोहोचत आहेत. यामुळे त्यांच्यासह त्यांच्या कुटुंबीयांनाही करोनाचा धोका आहे. त्यामुळे या कर्मचाऱ्यांना सुरक्षित निवास देण्याच्या उद्देशाने ही इमारत उभारण्यात आली आहे. जोगेश्वरी येथे असलेल्या या ३ मजली वसतिगृहात ५४ व्यक्ती सामावून घेण्याची क्षमता आहे. अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना येथे राहण्यासाठी भाडे आकारले जाणार नाही. करोनाच्या काळात इतरत्र तात्पुरते वास्तव्यास असलेल्या अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना कर्तव्यावर पोहोचताना प्रवासात करोना संसर्ग होण्याचा धोका आहे. शिवाय काही वेळा या कर्मचाऱ्यांना जीवनावश्यक वस्तू पुरेशा उपलब्ध होत नाहीत. त्यांच्यासाठी नव्याने उभारलेल्या वसतिगृहात मात्र त्यांना जीवनावश्यक वस्तू पुरेशा प्रमाणात उपलब्ध होणार आहेत.

## नवी मुंबईतील पाच शाळांवर कारवाई?

**नवी मुंबई :** शैक्षणिक शुल्क तात्काळ न भरल्याने विद्यार्थ्यांना ऑनलाइन वर्गात बसू दिले जात नसल्याची शाळांची मनमानी सुरू आहे. नवी मुंबई महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी चार शाळांचे ना हरकत प्रमाणपत्र तसेच एका शाळेची मान्यता रद्द करण्याची शिफारस मुंबई शिक्षण उपसंचालकांकडे केली आहे.

न्यू होरायझन पब्लिक स्कूल, ऐरोली तेरणा ऑर्चिड इंटरनॅशनल स्कूल, कोपरखैरणे, सेंट लॉरेन्स स्कूल, वाशी, रायन इंटरनॅशनल स्कूल, सानपाडा, अमृता विद्यालय, नेरुळ या ५ शाळांच्या तक्रारी नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागात आल्या होत्या. विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवू नये याबाबत सूचित करण्यात आलेले होते. तरीही शुल्क न भरलेल्या विद्यार्थ्यांना या शाळा ऑनलाइन शिक्षणापासून वंचित ठेवत होत्या. शासनाच्या आदेशाचे पालन न केल्यामुळे कारवाई करण्याची शिफारस शिक्षण उपसंचालक यांच्याकडे केली आहे.

प्रगतीची सुरुवात, भरोशाची साथ.....
“आपली गाडी, आपलं उत्पन्न” संपूर्ण महाराष्ट्राच्या नागरिकांसाठी....
वर्षाची मोठी ऑफर्स
गाडी खरेदी करा आणि फक्त
80,000/-* च्या DOWNPAYMENT मध्ये



विकत घ्या स्वत:ची नवीन T-PERMIT CAR
आणि कमवा दर महा Rs. 70,000/-* FIXED PACKAGE
आपली CAR आजचं बुक करा फक्त
रू Rs. 9,999/-* मध्ये आणि मिळवा
Exciting Exchange Offer's*
पहिले १० बुकिंग साठी
रु. 1,00,000 /- पर्यंतचा DISCOUNT
HURRY UP ! Limited Period OFFER*
हमखास बक्षिसे
१ ग्रॅम सोन्याचे नाणे
२ अत्यावश्यक वस्तू
Contact : 7843883333 / 7532884444
Address : YASH CARS ,228, Satra Plaza, 2nd Floor, Plot No. 19/20, Sec.- 19D, Palm Beach Road, Vashi, Navi Mumbai www.yashcars.com
YASH CARS
Follow us on :

## राज्यात ९,८१२ नवे रुग्ण

**मुंबई :** राज्यात दिवसभरात करोनाच्या ९,८१२ नव्या रुग्णांची नोंद झाली तर १७९ जणांचा मृत्यू झाला. कोल्हापूर जिल्ह्यात दैनंदिन दोन हजारांच्या आसपास नवे रुग्ण आढळले आहेत.

गेल्या २४ तासांत रायगड ६४६, पुणे जिल्हा ६२९, पुणे शहर २४३, पिंपरी-चिंचवड २३२, सोलापूर ४१८, सातारा ९३८, कोल्हापूर १९५२, सांगली १०२१, सिंधुदुर्ग ४००, रत्नागिरी ४५३ नव्या रुग्णांची नोंद झाली. राज्यात सध्या १ लाख २१ हजार रुग्ण उपचाराधीन आहेत.

## मुंबईत ६४८ बाधित

**मुंबई:** मुंबईत शनिवारी ६४८ रुग्ण नव्याने आढळले आहेत, तर १५ जणांचा मृत्यू झाला आहे. शनिवारी बरे होणाऱ्या रुग्णांची संख्या बाधितांच्या तुलनेत अधिक आढळली आहे.

## ठाणे जिल्ह्यात ४३२ जणांना संसर्ग


**ठाणे :** ठाणे जिल्ह्यात शनिवारी ४३२ करोना रुग्ण आढळून आले. तर १८ जणांचा मृत्यू झाला.

# ‘इग्नू’ची ज्योतिषशास्त्राला विद्याशाखा म्हणून मान्यता

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई:** इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठात (इग्नू) आता ज्योतिषशास्त्र शिकवण्यात येणार आहे. काही वर्षांपूर्वी विद्यापीठ अनुदान आयोगाने अशाच स्वरूपाचा अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी केलेला प्रयत्न देशभरातील अभ्यासक आणि वैज्ञानिकांनी हाणून पाडला होता. मात्र आता इग्नू पुन्हा एकदा अशाच स्वरूपाचा घाट घालत असल्याचे दिसत आहे.

इग्नू यंदापासून ज्योतिषशास्त्रात पदव्युत्तर पदवी (एमए) आणि पदविका (डिप्लोमा) सुरू करणार आहे. नुकतेच या अभ्यासक्रमाचे उद्घाटन झाले. हिंदी आणि संस्कृत माध्यमातून हा अभ्यासक्रम होईल. विद्यापीठाच्या ५७ प्रादेशिक केंद्रांवर हा अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ग्रह-ताऱ्यांचा मानवी जीवनावर कसा परिणाम होतो यावर हा अभ्यासक्रम बेतलेला असेल. ज्योतिषशास्त्र, ग्रह-ताऱ्यांचे परिणाम, कुंडली याबाबत अनेक मतभेद आहेत. मात्र आता त्याला स्वतंत्र विद्याशाखेचा दर्जा देण्याचा घाट इग्नूने घातला आहे. ग्रहणांबाबत खगोल अभ्यासकांकडून जनजागृतीवर भर देण्यात येत असताना या अभ्यासक्रमात मात्र ग्रहणांचे मानवी जीवनावर होणारे परिणाम असा घटक समाविष्ट करण्यात आला आहे. प्राचीन ऋषींची मते काय होती, त्याचा आधार घेऊन घटकांची मांडणी करण्यात आल्याचे इग्नूचे म्हणणे आहे. विज्ञानप्रेमींकडून सातत्याने याबाबतच्या दाव्यांना आव्हाने दिले जाते. त्यामुळे राष्ट्रीय विद्यापीठाने सुरू केलेला हा अभ्यासक्रम वादग्रस्त ठरण्याची शक्यता आहे.



### अभ्यासक्रमात काय?

भारतीय ज्योतिषाचा परिचय आणि इतिहास, सिद्धांत ज्योतिष आणि काळ, पंचाग, मुहूर्त, कुंडली, फलविचार, गणित, ग्रहणवेध आणि यंत्र, संहिता ज्योतिष, ज्योतिर्विज्ञान, वेदांग ज्योतिष

### वादाचा इतिहास

यापूर्वी २००१ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने अशाच स्वरूपाचा अभ्यासक्रम सुरू केला होता. तेव्हा शास्त्रज्ञांनी अशा स्वरूपातील अभ्यासक्रमाला विरोध केला होता. त्यानंतर हा अभ्यासक्रम रद्द करण्यात आला.

### अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडून विरोध

मुंबई : इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाने (इग्नू) सुरू केलेल्या ज्योतिषशास्त्र अभ्यासक्रमाला विरोध दर्शवत तो तातडीने रद्द करावा, अशी मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने (अंनिस) केली आहे.

## ‘त्या’ लशींच्या वापराबाबत माहिती देण्याचे आदेश

**मुंबई :** लस घोटाळाप्रकरणी कांदिवली हिरानंदानी हेरिटेजमधील नागरिकांना दिलेल्या बनावट प्रमाणपत्रावर नमूद केलेल्या लशींच्या बॅचचा वापर कुठे केला त्याची माहिती देण्याचे आदेश २७ रुग्णालयांना पालिकेने दिले आहेत.

कांदिवलीच्या हिरानंदानी हेरिटेजमधील १०० नागरिकांना बनावट लस दिल्याचे समोर आल्यानंतर नानावटी, लाइफ सायन्स आणि गोरगाव नेस्को रुग्णालयाच्या नावाने बनावट प्रमाणपत्र दिल्याचे समोर आले होते. ‘एका बॅचमध्ये १० लाख मात्रांचा समावेश असतो. अशा चारही बॅचमध्ये समाविष्ट असलेल्या लशी कोणकोणत्या रुग्णालयांना कंपनीने पुरविल्या आहेत याची माहिती सीरमने पाठविली.

त्यात देशभरातील रुग्णालयांचा समावेश आहे. मुंबईत यातील २७ खासगी रुग्णालये आहेत. या चार बॅचच्या लशींचा वापर कोणत्या ठिकाणी केला याची माहिती पाठविण्याचे या रुग्णालयांना शुक्रवारी कळवण्यात आले.

ALKYL
अल्कील अमिन्स केमिकल्स लिमिटेड
नोंदणी. कार्यालय: ४०१-४०७, निर्माण व्यापार केंद्र, प्लॉट क्र. १०, सेक्टर १७, वाशी, नवी मुंबई- ४००७०३.
दूर. क्र.: ०२२-६७९४६६१८, फॅक्स: ०२२-६७९४६६६६
ई-मेल: legal@alkylamines.com, संकेतस्थळ: www.alkylamines.com
सीआयएन: एल९९९९९एमएच१९७९पीएलसी०२१७९६

**४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची, ई-मतदान आणि बुक क्लोझरची सूचना**

सूचना याद्वारे देण्यात येत आहे की, अल्कील अमिन्स केमिकल्स लिमिटेड (“कंपनी”) ची ४१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार, जुलै २०, २०२१ रोजी दुपारी ०२.३० वा. (भाप्रवे) कंपनी कायदा, २०१३ च्या सर्व लागू असलेल्या तरतुदी आणि त्याअंतर्गत करण्यात आलेले नियम आणि भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ (“सेबी”) (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अ‍ॅण्ड डिस्क्लोझर रिक्वायरमेंट्स) नियमावली, २०१५ सह वाचल्या जाणाऱ्या कंपनी व्यवहार मंत्रालयाच्या द्वारे (“एमसीए”) जारी करण्यात आलेले सामान्य परिपत्रक क्र. ०२/२०२१ दिनांकित जानेवारी १३, २०२१, क्र. १४/२०२० दिनांकित एप्रिल ८, २०२०, क्र. १७/२०२० दिनांकित एप्रिल १३, २०२० आणि क्र. २०/२०२० दिनांकित मे ५, २०२० आणि सेबीद्वारे जारी करण्यात आलेले परिपत्रक दिनांकित जानेवारी १५, २०२१ आणि मे १२, २०२० अनुसार एजीएमच्या सूचनेमध्ये देण्यात आलेल्या विषयांवर विचार करण्यासाठी व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) किंवा अन्य ऑडियो व्हिज्युअल माध्यमांच्या (ओएव्हीएम)द्वारे आयोजित करण्यात आली आहे.

नमूद परिपत्रकांच्या अनुपालनासाठी एजीएम सूचना आणि आर्थिक वर्ष २०२०-२०२१ साठी वार्षिक अहवाल जून २५, २०२१ रोजी इलेक्ट्रॉनिक पद्धतीद्वारे डिपॉझिटरी पार्टिसिपंटद्वारे नोंदविण्यात आलेल्या ई-मेल आयडीवर सभासदांना पाठविण्यात आले आहे. उपरोक्त कागदपत्रे कंपनीच्या www.alkylamines.com या संकेतस्थळावर, स्टॉक एक्स्चेंजच्या म्हणजेच बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या संकेतस्थळावर म्हणजेच अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com वर आणि नॅशनल सिक्युरिटीज ऑफ इंडिया लिमिटेड (एनएसडीएल)च्या https://www.evoting.nsdl.com या संकेतस्थळावरदेखील उपलब्ध आहे.

सूचना याद्वारे अशीदेखील देण्यात येत आहे की, कंपन्या (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियमावली, २०१४ च्या नियम १० सह वाचल्या जाणाऱ्या कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ९१ आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अ‍ॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) नियमावली, २०१५ च्या नियम ४१ च्या अनुषंगाने सभासदांची नोंदवही आणि कंपनीची भाग हस्तांतरण वही बुधवार, १४ जुलै २०२१ पासून मंगळवार, २० जुलै २०२१ (दोन्ही दिवस धरून) पर्यंत एजीएम आणि लाभांशाच्या कारणांसाठी बंद ठेवण्यात येईल.

कंपनी त्यांच्या सभासदांना ४१व्या एजीएमच्या सूचनेमध्ये देण्यात आलेल्या विषयांवर त्यांच्या सभासदांना त्यांच्या मतदानाचा अधिकार दूरस्थ ई- मतदान आणि एजीएम दरम्यान ई-मतदान पद्धतीद्वारे बजावता यावा यासाठी सुविधा उपलब्ध करून देत आहे आणि एजीएमला हजर असलेले सभासद ज्यांनी त्यांचे मत (मते) दूरस्थ ई-मतदानाच्या द्वारे केलेले नाही ते एजीएमच्या ठिकाणी मत देण्यास पात्र आहेत. सभासद ज्यांनी दूरस्थ ई- मतदानाच्या द्वारे मत (ते) दिली आहेत त्यांनादेखील एजीएमला हजर राहता येईल. परंतु एजीएमच्या ठिकाणी त्यांचे मत (ते) देण्यास पात्र नसतील.

दूरस्थ ई-मतदान शुक्रवार, जुलै १६, २०२१ रोजी स. ९.०० वा.पासून सुरू होईल आणि सोमवार, जुलै १९, २०२१ रोजी सायं. ५.०० वा. समाप्त होईल. मतदानासाठी दूरस्थ ई-मतदान प्रणाली त्यानंतर एनएसडीएलद्वारे अकार्यक्षम करण्यात येईल.

दूरस्थ ई-मतदानाच्या द्वारे आणि ४१ व्या एजीएमच्या ठिकाणी मतदानासाठी सभासदांची पात्रता निश्चित करण्यासाठी मंगळवार, जुलै १३, २०२१ हा कट ऑफ दिनांक निश्चित करण्यात आला आहे. इलेक्ट्रॉनिक मतदानाची प्रक्रिया एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद करण्यात आली आहे. समभागधारकांसाठी https://www.evoting.nsdl.com वर डाऊनलोड सेक्शनमध्ये उपलब्ध असलेल्या ई-मतदान युजर मॅन्युअलचा संदर्भ घ्यावा.

ई-मतदान किंवा व्हीसी/ ओएव्हीएमद्वारे हजर राहण्याच्या संदर्भात कोणतीही समस्या किंवा चौकशी असल्यास सभासद कुमारी पल्लवी म्हात्रे, व्यवस्थापक एनएसडीएल किंवा श्री. संजीव यादव, सहा. व्यवस्थापक, एनएसडीएल यांच्याशी evoting@nsdl.co.in / sanjeevy@nsdl.co.in वर किंवा टोल फ्री क्र. १८००१०२०९९० / १८००२२४४३० वर संपर्क करता येईल.

संचालक मंडळाच्या आदेशांद्वारे
अल्कील अमिन्स केमिकल्स लिमिटेडकरिता
सही/-
चिंतामणी डी. थत्ते
महाव्यवस्थापक (सचिवालय)
आणि कंपनी सचिव

ठिकाण: नवी मुंबई
दिनांक: जून २५, २०२१

## विशेष अतिजलद गाड्यांच्या सेवांना मुदतवाढ

रेल्वेने खाली दिलेल्या विशेष अतिजलद गाड्यांची सेवा वाढविण्याचा निर्णय घेतला आहे.

| ट्रेन क्र. | मुंबई ⇌ हटिया |
|---|---|
| 02811 | **लोकमान्य टिळक टर्मिनस – हटिया** विशेष दि. ४.७.२०२१ पासून २७.९.२०२१ पर्यंत दर रविवार आणि सोमवारी चालविण्यात येईल. |
| 02812 | **हटिया – लोकमान्य टिळक टर्मिनस** विशेष दि. २.७.२०२१ पासून २५.९.२०२१ पर्यंत दरशुक्रवार आणि शनिवारी चालविण्यात येईल. |
| **ट्रेन क्र.** | **मुंबई ⇌ विशाखापट्टणम** |
| 02858 | **लोकमान्य टिळक टर्मिनस– विशाखापट्टणम** विशेष दि. ६.७.२०२१ पासून पुढील सुचना मिळेपर्यंत दर मंगळवारी चालविण्यात येईल. |
| 02857 | **विशाखापट्टणम – लोकमान्य टिळक टर्मिनस** विशेष दि. ४.७.२०२१ पासून पुढील सुचना मिळेपर्यंत दर रविवारी चालविण्यात येईल. |
| **ट्रेन क्र.** | **मुंबई ⇌ पुरी** |
| 02865 | **लोकमान्य टिळक टर्मिनस –पुरी** विशेष दि. ८.७.२०२१ पासून पुढील सुचना मिळेपर्यंत दर गुरुवारी चालविण्यात येईल. |
| 02866 | **पुरी– लोकमान्य टिळक टर्मिनस** विशेष दि. ६.७.२०२१ पासून पुढील सुचना मिळेपर्यंत दर मंगळवारी चालविण्यात येईल. |
| **ट्रेन क्र.** | **मुंबई ⇌ भुवनेश्वर** |
| 02879 | **लोकमान्य टिळक टर्मिनस– भुवनेश्वर** विशेष दि. ३.७.२०२१ पासून पुढील सुचना मिळेपर्यंत दर बुधवार आणि शनिवारी चालविण्यात येईल. |
| 02280 | **भुवनेश्वर– लोकमान्य टिळक टर्मिनस** विशेष दि. १.७.२०२१ पासून पुढील सुचना मिळेपर्यंत दर सोमवारी आणि गुरुवारी चालविण्यात येईल. |

वरील विशेष अतिजलद गाड्यांच्या थांब्यांच्या सविस्तर वेळेसाठी कृपया **www.enequiery.indieanereail.gov.in** ला भेट द्या किंवा एनटीईएस ॲप डाउनलोड करा.

**आरक्षण**

लोकमान्य टिळक टर्मिनस येथून सुटणाऱ्या विशेष अतिजलद गाड्यांच्या विस्तारित फेऱ्यांचे विशेष शुल्कासह आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि **www.irctc.co.in** या संकेतस्थळावर दि. २७.६.२०२१ पासून सुरू होईल.

**बोर्डिंग, प्रवास आणि गंतव्यस्थानाच्या वेळी सर्व प्रकारच्या मानदंडांचे, कोविड-19 शी संबंधित एसओपीचे पालन करून या विशेष ट्रेनमध्ये फक्त कंफर्म तिकीट असणार्या प्रवाशांनाच परवानगी दिली जाईल.**

मध्य रेल्वे
www.cr.indianrailways.gov.in
centralrailwayindia | Central_Railway
रेल्वे हेल्पलाईन 139

TATA
टाटा मोटर्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय : बॉम्बे हाऊस, २४, होमी मोदी स्ट्रीट, मुंबई ४०० ००१.
टेलि : +९१ २२ ६६६५ ८२८२ ईमेल : inv_rel@tatamotors.com
वेबसाइट : www.tatamotors.com
सीआयएन : एल२८९२०एमएच१९४५पीएलसी००४५२०

**जाहीर सूचना – ७६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा**

असे कळविण्यात येते की सद्य चालू असलेली कोव्हिड-१९ महामारी लक्षात घेता, टाटा मोटर्स लिमिटेडच्या (“**कंपनी**”) सदस्यांची ७६वी वार्षिक सर्वसाधारण सभा (“**एजीएम**” / “**सभा**”) निगम कामकाज मंत्रालयाद्वारा निर्गमित केलेल्या (एकत्रितपणे “**एमसीए परिपत्रके**” म्हणून संदर्भित) सर्वसाधारण परिपत्रक क्र. ०८ एप्रिल २०२०, १३ एप्रिल २०२०, ०५ मे २०२० व १३ जानेवारी २०२१ आणि सिक्युरिटीज अ‍ॅण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (“**सेबी परिपत्रके**”) यांच्याद्वारा निर्गमित केलेली परिपत्रके दिनांकित १२ मे २०२० व १५ जानेवारी २०२१ यासह वाचलेल्या, कंपन्या अधिनियम, २०१३ आणि त्याखालील तयार केलेल्या नियमांच्या लागू तरतुदींच्या अनुपालनार्थ सामायिक स्थळी सदस्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय व्हिडीओ कॉन्फरन्स (“**व्हीसी**”) / अदर ऑडिओ व्हिज्युअल मीन्स (“**ओएव्हीएम**”) द्वारा बोलाविण्यात येणार आहे.

टाटा मोटर्स लिमिटेडच्या सदस्यांची ७६वी वार्षिक सर्वसाधारण सभा (“**एजीएम**”) एजीएम बोलाविणाऱ्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार कामकाजावर विचारविनिमय करण्याकरिता नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडद्वारा (“**एनएसडीएल**”) तरतूद केलेल्या “व्हीसी” / “ओएव्हीएम” या सुविधांद्वारा शुक्रवार, ३० जुलै २०२१ रोजी दु.०३.०० वा. (भाप्रवे) घेण्यात येणार आहे.

कंपनीच्या वित्तीय वर्ष २०२०-२१ करिता एकात्मीकृत अहवाल व वार्षिक लेखांसमवेत (“**एकात्मीकृत अहवाल**”) एजीएमची सूचना www.tatamotors.com या कंपनीच्या वेबसाइटवर आणि स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाइटवर म्हणजेच अनुक्रमे www.bseindia.com व www.nseindia.com या बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या वेबसाइट्सवर उपलब्ध असणार आहे. एजीएमची सूचना www.evoting.nsdl.com या नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडच्या (“एनएसडीएल”) वेबसाइटवरसुद्धा उपलब्ध असणार आहे.

सदस्य **केवळ** “व्हीसी” / “ओएव्हीएम” या सुविधांद्वारा एजीएममध्ये उपस्थित राहू शकतील व सहभागी होऊ शकतील, त्याबाबत तपशिलाची एजीएमच्या सूचनेमध्ये कंपनीद्वारा तरतूद करून देण्यात येईल. “व्हीसी” / “ओएव्हीएम” या सुविधांद्वारा उपस्थित राहणाऱ्या सदस्यांची परिगणना कंपन्या अधिनियम, २०१३ च्या कलम १०३ अंतर्गत किमान गणसंख्येच्या हेतूप्रीत्यर्थ करण्यात येईल.

एकात्मीकृत अहवालासमवेत एजीएमची सूचना अशा सदस्यांना इलेक्ट्रॉनिक प्रणालीत पाठविण्यात येणार आहेत, ज्यांचे ई-मेल पत्ते कंपनी / रजिस्ट्रार्स अ‍ॅण्ड ट्रान्स्फर एजन्ट (“**रजिस्ट्रार / आरटीए**”) / डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स (“**डीपी’ज**”) यांच्याकडे नोंदणीकृत आहेत. सेबी परिपत्रकांच्या अनुसार, कोणत्याही भागधारकास एजीएमची सूचना व एकात्मीकृत अहवालाच्या प्रत्यक्ष प्रती पाठविल्या जाणार नाहीत. ज्या सदस्यांनी अजून त्यांचे ई-मेल पत्ते कंपनी / आरटीएकडे नोंदणीकृत केलेले नाहीत, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी इलेक्ट्रॉनिक प्रणालीत एजीएमची सूचना व एकात्मीकृत अहवाल प्राप्त करण्याकरिता त्यांच्या ई-मेल पत्त्यांच्या नोंदणी आणि रिमोट ई-व्होटिंगकरिता लॉग-इन आयडी व पासवर्डच्या स्वीकृतीकरिता मंगळवार, २० जुलै २०२१ रोजी सायं. ०५.०० वा. (भाप्रवे) किंवा तत्पूर्वी खाली नमूद केलेल्या प्रक्रियेचे अनुसरण करावे :

ए) https://tpcl.linkintime.co.in/EmailReg/email_register.html या लिंकला भेट द्यावी.
बी) ड्रॉपडाऊनवरून कंपनीच्या नावाची निवड करा.
सी) डीपी आयडी व क्लायंट आयडी यासारख्या संबंधित फील्ड्समध्ये तपशिलाची नोंद करा (जर तुमच्याजवळ डिमॅट स्वरूपात भाग आहेत)/ फोलिओ नं. व सर्टिफिकेट नं. (जर भाग प्रत्यक्ष स्वरूपात आहेत), भागधारकाचे नाव, पॅन तपशील, मोबाइल नंबर व ई-मेल आयडी.
डी) सिस्टम मोबाइल नंबर व ई-मेल आयडीवर ओटीपी पाठवील.
ई) मोबाइल नंबर व ई-मेल आयडीवर स्वीकारलेल्या ओटीपीची नोंद करा आणि सादर करा.

एनएसडीएल सदस्याद्वारा ई-मेल पत्त्याची यशस्वीरीत्या नोंदणी झाल्यानंतर ४८ तासांच्या आत वार्षिक अहवाल २०२०-२१ यासह एजीएमची सूचना तसेच रिमोट ई-व्होटिंग युजर आयडी व पासवर्डसुद्धा ईमेल करील. कोणतीही शंका असल्यास, सदस्य csg-unit@tpclindia.co.in किंवा evoting@nsdl.co.in यावर लेखी कळवू शकतील.

ई-मेल पत्त्याच्या कायमस्वरूपी नोंदणीकरिता, डिमॅट स्वरूपात भाग असलेल्या सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर ई-मेल पत्ते त्यांच्या संबंधित डीपी’जकडे अपडेट ठेवावेत आणि ज्या सदस्यांकडे प्रत्यक्ष स्वरूपात भाग आहेत, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर ई-मेल पत्ते आरटीएकडे csg-unit@tpclindia.co.in यावर त्यांना लेखी कळवून अपडेट ठेवावेत.

एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व ठरावांवर कंपनीला तिच्या सर्व सदस्यांना त्यांच्या मतदानाचा हक्क बजाविण्याकरिता एनएसडीएलच्या रिमोट ई-व्होटिंग सुविधेची (“**रिमोट ई-व्होटिंग**”) तरतूद करून देताना आनंद वाटत आहे. याअतिरिक्त, कंपनी सभेच्या कालावधीत रिमोट ई-व्होटिंग सिस्टमद्वारा मतदानाच्या सुविधेचीसुद्धा तरतूद करून देईल. एजीएमपूर्वी / एजीएमदरम्यान रिमोट ई-व्होटिंगबाबत सविस्तर प्रक्रिया हा एजीएमच्या सूचनेचा एक भाग बनतो.

टाटा मोटर्स लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
होशंग के सेठना
कंपनी सचिव

मुंबई
२५ जून २०२१

CIDCO
WE MAKE CITIES

**Notice inviting Expression of Interest (EOI)**
**FOR**
**Development of Nhava Island - Navi Mumbai**

CIDCO, City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited ("Authority") is appointed the New Town Development Authority (NTDA) of Navi Mumbai under the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 and is engaged in the development Navi Mumbai. The purpose of CIDCO at the time of its creation was to develop Navi Mumbai as a counter magnet town for Mumbai in Maharashtra. CIDCO is now functioning as New Town Development Authority (NTDA) and Special Planning Authority (SPA) for development of several New Towns across Maharashtra by planning and developing entire urban infrastructure, providing municipal services, and executing large scale infrastructure projects including Navi Mumbai International Airport, Navi Mumbai Metro, International Corporate Park etc. Details of the Projects are available on the official website of the Authority at www.cidco.maharashtra.gov.in.

CIDCO developed 14 nodes of Navi Mumbai which are divided in North and South parts. The 7 nodes fall in the North part Airoli, Kopar Khairane, Vashi, Sanpada, Nerul and CBD Belapur; on the Southern part Kharghar, Kamothe, Kalamboli, Pushpak, Panvel, Ulwe and Dronagiri are the other 7 nodes. Nhava Island is located approx. 5 km from Ulwe Node towards the creek side.

CIDCO is in possession of approx. 60 Ha. of land pocket at Nhava. This is a peninsular area with Karanjade and Thane Creeks spanning on three sides facing the historic Elephanta island. This location is situated very closer to the Mumbai Transharbors Link (MTHL) connecting Sewri and Nhava and is well connected to Ulwe Node/township. Being the land parcel situated along the coastal stretch, the Coastal Zone Regulation (CRZ) permission are applicable. As per the Coastal Zone Management Plan (CZMP) applicable to this area about 30 Ha. falls in CRZ-II. As per the Navi Mumbai Development Plan, this area falls in Regional Park Zone (RPZ). CIDCO is of view that this entire land parcel can be used for tourism development or is an excellent for cultural and social activities like Picnic Spot.

In order to create interest about this Project amongst the prospective investors and buyers and seek inputs from them this EOI document is being released. The document expects to provide interested parties with the relevant information regarding the Project and to invite feedback from interested private sector applicants. The Applicants are advised to study this EOI document carefully before submitting their feedback & suggestions in response to the EOI Notice.

The feedback & suggestions received as part of the response from the industry participants to this EOI Document may or may not be used towards formalizing the RFP for the Project which is proposed to be released in the near future. No pre-qualification of Applicants is proposed to be done as part of this EOI. The right to accept/reject any or all the responses received is reserved with Authority without assigning any reason thereof.

The website to download the EOI document is www.cidco.maharashtra.gov.in. Any person/firm interest to develop, may submit the EOI as per formats given the EOI documents, in a sealed envelope Applications should be sent to the following address on or before 17:00 hours on 29.07.2021.

Associate Planner (GIS)
CIDCO Ltd
CIDCO/PR/125/2021-22

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in